# अभियंत्यांना निलंबित करता आमदारांना बेड्या का घालत नाही?

संपादकीय

सौ. जयश्री खाडिलकर-पांडे
सादर करीत आहेत

मराठवाड्यात दुष्काळाने भयंकर स्वरुप घेतले आहे. तिथे शेतीला तर पाणी नाहीच, पण पिण्याचेही पाणी नाही अशी स्थिती आहे. नोव्हेंबर महिन्यातच प्यायला पाणी नाही तर यापुढे उन्हाळ्यात सूर्य आग ओकू लागेल तेव्हा मराठवाड्याच्या जनतेवर पाण्यावाचून तडफडायची वेळ येणार आहे. या भयाण वास्तवाची माहिती घेऊनच महाराष्ट्र सरकारने वरच्या धरणांतून जायकवाडी धरणात पाणी सोडण्याचे नियोजन केले. मात्र संतापजनक बाब अशी की, स्थानिक नेत्यांनी यातूनही प्रसिध्दी मिळविण्यासाठी तमाशे सुरू केले आहेत. कुणी आत्मदहनाचे इशारे दिले, कुणी पाण्यात जलसमाधी घेण्याच्या घोषणा केल्या, कुणी पाणी सोडू देणार नाही म्हणून मनाला येईल तसा थयथयाट केला. आमच्या शेतीला पाणी द्या आणि मराठवाड्याच्या जनतेला पाण्यावाचून तडफडूदे असे सामान्य माणूस कधीच म्हणणार नाही. पण नेत्यांना यातही प्रसिध्दीची संधी दिसली आणि त्यांनी उड्या मारायला सुरूवात केली. पैसे देऊन चार डोकी गोळा करायची आणि नौटंकी करायची ही नेत्यांची जुनी स्टाईल आहे. मात्र, धरणातून पाणी सुटताच हे नेते जलसमाधी वगैरे शब्दच काय मराठी भाषाच विसरले आणि जीव वाचवत पळत सुटले.

त्यांची नाटके सुरू राहूदे. या नाटकांना जनता भीक घालत नाही. पण या नेत्यांनी आपली पोळी भाजून घेण्यासाठी मूळचे श्रीगोंद्याचे कार्यकारी अभियंता बी. जी. खताळ आणि मूळचे नारायणगावचे कार्यकारी अभियंता शिवाजीराव बोलभट यांचा बळी देण्याचे ठरविले आहे आणि हे कदापि होता कामा नये.

मराठवाड्याला पाणी सोडण्याचा प्रश्न तापला आहे याचा फायदा घेऊन नगरच्या कुकडी कालव्यातून स्वत:च्या जामखेड मतदारसंघाला पाणी सोडा यासाठी आमदार राम शिंदे दादागिरी करीत होते. पाण्याच्या नियोजनासाठी ६ नोव्हेंबरला उपजिल्हाधिकारी (निवासी) डॉ. सतीश जाधव यांनी कालवा सल्लागार समितीची बैठक घेतली तेव्हा आमदारांनी कोणतीही मागणी केली नाही. आमदार शांत बसून होते. बैठकीत शांत राहायचे आणि लोक समोर दिसले की नेत्यांच्या अंगात संचारते तसेच झाले. आमदार राम शिंदे यांनी कुकडी येथे त्यांची हजारो माणसे पाठविली आणि तेथे कार्यरत असलेले कार्यकारी अभियंता शिवाजी बोलभट, इनचार्ज अभियंता बी. जी. खताळ यांना सांगितले की, कालव्यातून जामखेडला पाणी सोडा. मात्र असा निर्णय न झाल्याने अभियंत्यांनी नकार देताच थयथयाट सुरु झाला. आमदार राम शिंदे यांनी जिल्हाधिकारी कार्यालयात आत्मदहनाचे नाटक केले आणि मग त्यांनी जिल्हाधिकाऱ्यांनाच फैलावर घेतले. आमदार गरजले की, त्या अभियंत्यांना इकडे बोलवा आणि पाणी सोडतो असे म्हणायला लावा नाहीतर त्यांना निलंबित करा. त्यांना निलंबित करणार असे आश्वासन द्या.

आमदारासमोर आपले चालत नाही अशी जनमानसात भिती असल्याने जिल्हाधिकाऱ्यांनी हो म्हटले. आज या दोन अभियंत्यांना निलंबित करण्याची पत्रे जिल्हाधिकारी कार्यालयाकडून गेली आहेत. हे जे घडले ते मूग गिळून सहन करायचे का? हे जर नेत्यांना पचले तर उद्या ते मतदारसंघातील मतदारांना खूष करण्यासाठी धरणात आंघोळी करतील. दरवेळी कायदा हा फक्त नोकरांवर का उगारला जातो? कायदा पाळणारा कर्मचारी बळी का जातो? कायदा हा आमदाराला लागू होत नाही का? या दोन अभियंत्यांच्या मागे समाज खंबीरपणे उभा राहिला पाहिजे. नाहीतर या राज्यात अराजक होईल. एक वेळ अशी येईल की श्वेतपत्रिका काढण्याचा सोपस्कार लाजेपुरता करण्याचीही गरज नेत्यांना वाटणार नाही. सार्वजनिक बांधकाम व पाटबंधारे कर्मचारी संघटनेचे रमेशभाई आगवणे हे घडलेल्या प्रकाराने संतप्त आहेत. अभियंते संतप्त आहेत. त्यांनी आंदोलन करायलाच हवे.

नगरच्या कुकडी धरणात झाले तसाच प्रकार मुळा धरणात झाला. या धरणातून मराठवाड्यासाठी जायकवाडी धरणात पाणी सोडायचे असताना आमदार शिवाजी कार्डिले, माजी आमदार चंद्रशेखर कदम, माजी आमदार तनपुरे, जिल्हाप्रमुख रावसाहेब खेवरे असे सर्व पक्षाचे नेते एकत्र झाले आणि त्यांनी सरळ कालव्याचे पाणी सोडून दिले. कोणतेही नियोजन न करता तीन तास कालव्यातून धो धो पाणी वाहत होते. या सर्व नेत्यांनी हे पाप कशासाठी केले? दारणा धरणापाशी माजी आमदार काशिनाथ मेंगाळ यांनी समर्थकांना आणून अशीच दडपशाही करण्याचा प्रयत्न केला.

महाराष्ट्रातील धरणे हा संरक्षित परिसर असतो. तिथे कडेकोट बंदोबस्त असतो. या धरणातील पाणी ही राज्याची संपत्ती आहे. त्याचे शासकीय पातळीवर नियोजन होते आणि नियोजन करूनच आवश्यकतेनुसार पाणीवाटप झाले पाहिजे. पण अशा संरक्षित ठिकाणी आपले कार्यकर्ते आणून नेते तमाशा करतात, धरणाचे दरवाजे उघडतात हा फार मोठा गुन्हा आहे. या गुन्ह्याबद्दल या नेत्यांना बेड्या ठोकायला हव्या.

सिंचनाची श्वेतपत्रिका काढून अजित पवार देवगिरीवर उपमुख्यमंत्री म्हणून परत जाण्याची तयारी पूर्ण झाली आहे. देवगिरी दिव्यांनी झगमग झाली आहे. दादा तुम्ही परतल्यावर हिंमत दाखवून नेत्यांना शिक्षा करा आणि अभियंत्यांना सोडवा. तसे झाले नाही तर ङ्गदेवगिरीफ धुसर होऊन ङ्गदादागिरीफ अक्षरे दिसायला लागतील आणि ङ्गदादागिरीफ फार काळ चालत नाही हे गेल्या काही महिन्यांत स्वत: साहेबांनीच दाखवून दिले आहे.